MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

# इमहाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

23/08/2018

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. २४/२०१८-१९/९८ दिनांक:२३.०८.२०१८

**आदेश**

**आदेश केस क्र. २४(२०१८-२०१९)**

| | | |
|---|---|---|
| | मेंसर्स इंटीग्रेटेड एनर्जी इंजिनिअरींग<br>पंचतारांकित औद्योगिक वसाहत<br>कागल ता. कागल जि. कोल्हापूर | **अर्जदार** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर | **पक्षकार** |
| २) | कार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>ग्रामिण विभाग-२ | |
| ३) | उपकार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उप विभाग कागल | |

**कोरम:-**१.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२.श्री. पी.व्ही.. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. पुजारी, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

**न्यायनिर्णय**

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

प्रस्तुतची तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्षाच्या दिनांक २६.०४.२०१८च्या आदेशाने व्यथित होऊन दाखल केलेली आहे.

## गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप.

तक्रारदाराचे थोडक्यात कथन असे की, तक्रारादार प्लॉट क्र. D-३७३ पंचतांकिरत औद्योगिक वसाहत कागल जि.कोल्हापूर येथे वर नमूद नावाने उद्योग चालवितो त्यांचा महावितरण ग्राहक क्रमांक २५१०१०९६७१६६ असा आहे. वि.प. कंपनीतर्फे माहे जानेवारी- २०१८ चे दिनांक ०५.०२.२०१८ चे रक्कम रु. १,९२,१४०/- चे विद्युत देयक देण्यात आले. सदर विद्युत देयकाची अंतिम तारीख दिनांक २०.०२.२०१८ अशी होती. तक्रारदाराचे कथनानुसार सदर तारखेनंतर म्हणजे दिनांक २२.०२.२०१८ रोजी वि.प. कंपनीचा कर्मचारी सदर विज पुरवठा खंडीत करण्याकरिता आला असता तक्रारदारांच्या कर्मचा-यांनी त्यास विज बिल भरीत आहोत तरी विज पुरवठा खंडीत करु नये. अशी विनंती केली असताना देखिल वि.प. कंपनीच्या कर्मचा-याने विज पुरवठा खंडीत केला व तो विज पुरवठा ४ तास खंडीत राहिला. त्यामुळे तक्रारदारांच्या दोन शिफ्टच्या उत्पादनाचे नुकसान झाले व त्यात तक्रारादाराचा कृषी नळ फुटला त्यामुळे तक्रारदारांचे ८०,०००/- रुपयाचे नुकसान झाले तक्रारादाराचे कथनानुसार विज पुरवठा खंडीत करण्यापूर्वी विज कायदा २००३ च्या कलम ५६ अनुसार विज वितरण कंपनीने विज पुरवठा खंडीत करण्याकरिता १५ दिवसाचे कालावधीची नोटीस देणे आवश्यक असतांना सुध्दा अशी कोणतीही लिखित नोटीस तक्रारदारांना दिलेली नव्हती. अचानक विज पुरवठा खंडीत करण्यात आल्यामुळे तक्रारदारांच्या Electrical भटयांचे नुकसान झालेले आहे. तरी त्याबाबत भरपाई तक्रारदारास मिळावी या मागणी करिता अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे तक्रार दाखल केली असता दिनांक २६.०४.२०१८ चे आदेशाने सदरची तक्रार फेटाळून लावणेत आली . सबब तक्रारदारांना ही तक्रार दाखल करणे भाग पडलेले आहे. अशा कथना वरुन तक्रारदाराच्या झालेल्या नुकसानांबद्दल भरपाईची मागणी तक्रारदाराने केलेली आहे.

## वि. प. यांची भूमिका.

प्रस्तुत प्रकरणाची नोटीस बजावल्यानंतर वि.प. कंपनीने हजर होऊन आपले म्हणणे खालील प्रमाणे मांडलेले आहे.मेंसर्स इंटीग्रेटेड एनर्जी इंतिनिरींग यांची पंचतारांकीत एम.आय.डी.सी. मध्ये ड-७३ येथे औद्योगिक जोडणी असून त्यांचा ग्राहक क्र. २५१०१०९६७१६६ आहे. अअ/कोमं/तांत्रिक /उपकाअ/२४५० दिनांक १३.०३.२०१८ पत्रानुसार मेंसर्स इंटीग्रेटेड एनर्जी इंजिनिरिंग यांनी दिनांक २२.०२.२०१८ रोजी विद्युत पुरवठा खंडीत केलेबाबत अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाकडे परिशिष्ट 'क्ष' मधील तक्रार दाखल केलेली आहे. मेसर्स. इंटीग्रेटेड एनर्जी इंतिनिरींग यांचे माहे डिसेंबर २०१७ चे वीज देयक थकीत असलेने सोमवार दिनांक ०५.०२.२०१८ रोजी विद्युत देयक न भरल्यास आपला विद्युत पुरवठा बंद करणेत येईल अशा आशयाची १५ दिवसांची नोटीस देण्यात आली होती व ही नोटीस शाखा कार्यालय कागल(अर्बन) या कर्मचा-यांनी सोमवार दिनांक ०५.०२.२०१८ रोजी सदर ग्राहकाच्या वितरण पेटीला चिकटवली होती. त्यामुळे शाखा कार्यालयातील कर्मचा-यांना जानेवारी-२०१८ च्या थकबाकी वसूली यादीमध्ये पुनः मेसर्स इंटीग्रेटेड एनर्जी इंजिनिरिंग यांचे वीज देयक भरले नसलेचे निर्दशनास आलेने कर्मचा-यांनी मेसर्स इंटीग्रेटेड एनर्जी इंजिनिरिंग थकीत विद्युत देयकापोटी विद्युत पुरवठा दिनांक २२.०२.२०१८ रोजी बंद केला. या पत्रासोबत ग्राहकाने विद्युत भरणा केलेला सविस्तर माहिती जोडण्यात आलेली आहे त्यावरुन आपणास मेसर्स इंटीग्रेटेड एनर्जी इंजिनिरींग विद्युत देयक नियमितपणे भरत नसलेचे निर्दर्शनास येईल.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी आज दिनंक ०६.०८.२०१८ रोजी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी तक्रारदारातर्फे श्री विकास घोडके तर वि.प. कंपनीतर्फे श्री गणेश पोवार, उपकार्यकारी अभियंता उपाविभाग कागल हे हजर होते. त्यांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

आमच्या निष्कर्षाकरिता खालील मुद्दे उपस्थित होतात.

१) प्रस्तुतची तक्रार हया मंचापुढे चालण्यास पात्र आहे काय?
उत्तरः- नाही
२) अंतिम आदेश
उत्तरः- तक्रार खारीज करण्यात येत आहे.
आमच्या वरील निष्कर्षाची कारणे खालील प्रमाणे आहे.

**कारणमिमांसा**

**मुद्दा क्र.१ व २ :-** तक्रारादारांची पक्ष कथने विचारात घेता ही बाब प्रकर्षाने आढळून येते की, वादातील विज देयकाची रक्कम तक्रारदारांचा विज पुरवठा खंडीत केल्याचे क्षणापर्यन्त , तक्रारदारांनी भरलेली नव्हती थकबाकी करिता विज पुरवठा खंडीत करण्याचे कायदेशीर हक्क वि.प. कंपनीला आहेत. हया बाबतीत तक्रारादारांचा काही आक्षेप नाही. तक्रारदाराची तक्रार एव्हढीच आहे की, त्यांचा विज पुरवठा विज कायदा २००३ च्या कलम ५६ चा भंग करुन म्हणजे सदर कलमात नमूद केलेली १५ दिवसाची नोटीस न देता वि.प. कंपनीच्या कर्मचा-यांनी त्यांचा विद्युत पुरवठा खंडीत केला आहे व त्यामुळे त्यांचे नुकसान झाले आहे वि.प. कंपनीच्या कथनानुसार विज कायदा २००३ च्या कलम ५६ ची १५ दिवसांची नोटीस ही विज पुरवठा खंडीत करण्यापूर्वी तक्रारदारांवर बजावण्यात आली होती व त्यानंतरच तक्रारदारांचा विज पुरवठा खंडीत करण्यात आला होता. वि.प. कंपनीचे हे कथन तक्रारदारांनी अमान्य केले आहे. वि.प. कंपनीने अशी नोटीस बजावली किंवा नाही. हा पुराव्याचा भाग आहे व तो योग्य तो पुरावा देऊन वि.प. कंपनीला शाबीत करावा लागेल आणि असा पुरावा आल्यानंतर तक्रारदारांचा विज पुरवठा खंडीत करण्याचे कृत्य हे कायदेशीर होते किंवा बेकायदेशीर होते हयाचा जाहीर नामा (Declaration) द्यावे लागेल, आणि त्यानंतरच तक्रारदारांची नुकसान भरपाईची मागणी मंजूर करावी किंवा करु नये हयाचा निर्णय घ्यावा लागेल. ही बाब दिवाणी स्वरुपाच्या वादाची असून ती सर्वस्वी दिवाणी न्यायालयाच्या अखत्यारितील आहे.

हया मंचाचे मते महाराष्ट्र विज नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ च्या कलम २.१.३ मध्ये दिलेल्या गा-हाणे हया शब्दाच्या व्याख्येवरुन हया मंचाचे किंवा अंतर्गत तक्रार निवारण कक्षाचे कार्यक्षेत्र हे अत्यंत सिमित स्वरुपाचे आहे. सदरची व्याख्या खालील प्रमाणे आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

**"गा-हाणे"** म्हणजे एखाद्या I वितरण परवाने धारकाने परवाना कंत्राट, करारान्वये किवा आयोगाने निर्निर्दिष्ट केलेल्या वीज पुरवठा संहिते खाली किंवा वितरण परवाने धारकांच्या कामगिरीच्या मानकांच्या संदीर्भात पार पाडण्यासाठी स्वीकारलेल्या कामगिरीचा दर्जा, स्वरुप , ती पार पाडण्याची पध्दत, या मधील कोणताही दोष, अपूर्णता, त्रुटी किंवा अपुरेपणा; ज्यात इतर बाबीं बरोबरच (अ) जीवाला किंवा मालमत्तेला धोका ठरु शकणा-या वितरण यंत्रणेची सुरक्षितता आणि (ब) आयोगाच्या कोणत्याही आदेशाचे पालन न करणे किंवा त्या अनुषंगाने करावयाची कोणतीही कार्यवाही, जी मंच किंवा विद्युत लोकपालाच्या, जसे असेल तसे, अधिकारक्षेत्रात येत असेल, त्याबाबतचे गा-हाणे ,यांचा समावेश होतो.

हयांचा समावेश होतो. हयामध्ये कुठेही वि.प. कंपनीच्या कुठल्याही कृत्याची कायदेशीरता किंवा बेकायदेशीरता ठरण्याचे अधिकार हया मंचाला देण्यात आलेले नाहीत . कुठलाही दिवाणी वाद सोडवण्याकरिता, दिवाणी प्रक्रिया संहिताच्या कलम ९ खाली केवळ दिवाणी न्यायालयालाच हे अधिकार देण्यात आलेले आहेत. ज्या कायद्यानुसार या मंचाची स्थापना करण्यात आलेली आहे त्या कायद्यात अशा प्रकारचे दिवाणी वाद सोडवण्याचे कोणतेही अधिकार, जरी हे मंच अर्ध न्यायिक स्वरुपाचे (Quasi-Judicial) असले तरीही देण्यात आलेले नाही. हया तक्रार अर्जाचा मुळ गाभाच वि.प. कंपनीने तक्रारदाराचा विज पुरवठा कायदेशीररित्या किंवा बेकायदेशीरित्या खंडीत केला किंवा नाही हया प्रश्नावर अवलंबून आहे आणि ते ठरविण्याचा अधिकार हा केवळ दिवाणी न्यायालयाला येतो. या मंचाचे कार्यक्षेत्र वर नमूद केल्याप्रमाणे अत्यंत सिमीत आहे. त्यामुळे हयातील वाद हया मंचापुढे चालू शकत नाही.

सबब प्रस्तुतचे प्रकरण नामंजूर करावे लागेल हया निष्कर्षाला हे मंच आलेले आहे. सबब आम्ही मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देत खालील आदेश पारीत करीत आहोत.

## आदेश

१) प्रस्तुतची तक्रार कार्यक्षेत्राच्या बाधेमुळे काढून टाकण्यात येत आहे.
२) तक्रारदाराने योग्य त्या न्यायालयापुढे दाद मागावी.
३) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

मी माझे स्वतंत्र निर्णय देत आहे.

( पी.एस. पुजारी)
ग्राहक सदस्य

(पी. व्ही. खपली)
सदस्य सचिव

(ए.व्ही. देशपांडे)
अध्यक्ष

मी प्रशांत पुजारी ग्राहक सदस्य, वरील निर्णयाशी मी सहमत नाही. माझा स्वतंत्र न्याय निर्णय देत आहे. तो या निकालाचा भाग समजण्यात यावा. **(पुढील पानावर वेगळे मत देण्यात आलेले आहे)**

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. महावितरण

## १) गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप.

तक्रारदाराचे थोडक्यात कथन असे की, तक्रारादार प्लॉट क्र. D-३७३ पंचतारांकीत औद्योगिक वसाहत कागल जि.कोल्हापूर येथे वर नमूद नावाने उद्योग चालवितो त्यांचा महावितरण ग्राहक क्रमांक २५१०१०९६७१६६ असा आहे. वि.प. कंपनीतर्फे माहे जानेवारी- २०१८ चे दिनांक ०५.०२.२०१८ चे रक्कम रु. १,९२,१४०/- चे विद्युत देयक देण्यात आले. सदर विद्युत देयकाची अंतिम तारीख दिनांक २०.०२.२०१८ अशी होती. तक्रारदाराचे कथनानुसार सदर तारखेनंतर म्हणजे दिनांक २२.०२.२०१८ रोजी वि.प. कंपनीचा कर्मचारी सदर विज पुरवठा खंडीत करण्याकरिता आला असता तक्रारदारांच्या कर्मचा-यांनी त्यास विज बिल भरीत आहोत तरी विज पुरवठा खंडीत करु नये. अशी विनंती केली असताना देखिल वि.प. कंपनीच्या कर्मचा-याने विज पुरवठा खंडीत केला व तो विज पुरवठा ४ तास खंडीत राहिला. त्यामुळे तक्रारदारांच्या दोन शिफ्टच्या उत्पादनाचे नुकसान झाले व त्यात तक्रारादाराचा कृषी नळ फुटला त्यामुळे तक्रारदारांचे ८०,०००/- रुपयाचे नुकसान झाले तक्रारादाराचे कथनानुसार विज पुरवठा खंडीत करण्यापूर्वी विज कायदा २००३ च्या कलम ५६ अनुसार विज वितरण कंपनीने विज पुरवठा खंडीत करण्याकरिता १५ दिवसाचे कालावधीची नोटीस देणे आवश्यक असतांना सुध्दा अशी कोणतीही लिखित नोटीस तक्रारदारांना दिलेली नव्हती. अचानक विज पुरवठा खंडीत करण्यात आल्यामुळे तक्रारदारांच्या Electrical भटयांचे नुकसान झालेले आहे.तसेच यापूर्वीही दिनांक ०८.०२.२०१८ रोजी देखिल वीज बिल भरले असतानाही वि.प.कंपनीच्या कर्मचा-यांने पूर्व सूचना न देता अचानक विज पुरवठा खंडीत केला होता. तरी त्याबाबत भरपाई तक्रारदारास मिळावी या मागणी करिता अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे तक्रार दाखल केली असता दिनांक २६.०४.२०१८ चे आदेशाने सदरची तक्रार फेटाळून लावणेत आली . सबब तक्रारदारांना ही तक्रार दाखल करणे भाग पडलेले आहे. अशा कथना वरुन तक्रारदाराच्या झालेल्या नुकसानांबद्दल भरपाईची मागणी तक्रारदाराने केलेली आहे.

## २) वि. प. यांची भूमिका.

प्रस्तुत प्रकरणाची नोटीस बजावल्यानंतर वि.प. कंपनीने हजर होऊन आपले म्हणणे खालील प्रमाणे मांडलेले आहे.मेंसर्स इंटीग्रेटेड एनर्जी इंतिनिरींग यांची पंचतारांकीत एम.आय.डी.सी. मध्ये ड-७३ येथे औद्योगिक जोडणी असून त्यांचा ग्राहक क्र. २५१०१०९६७१६६ आहे. अअ/कोमं/तांत्रिक /उपकाअ/२४५० दिनांक १३.०३.२०१८ पत्रानुसार मेंसर्स इंटीग्रेटेड एनर्जी इंजिनिरिंग यांनी दिनांक २२.०२.२०१८ रोजी विद्युत पुरवठा खंडीत केलेबाबत अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाकडे परिशिष्ट 'क्ष' मधील तक्रार दाखल केलेली आहे. मेसर्स. इंटीग्रेटेड एनर्जी इंतिनिरींग यांचे माहे डिसेंबर २०१७ चे वीज देयक थकीत असलेने सोमवार दिनांक ०५.०२.२०१८ रोजी विद्युत देयक न भरल्यास आपला विद्युत पुरवठा बंद करणेत येईल अशा आशयाची १५ दिवसांची नोटीस देण्यात आली होती व ही नोटीा शाखा कार्यालय कागल(अर्बन) या कर्मचा-यांनी सोमवार दिनांक ०५.०२.२०१८ रोजी सदर ग्राहकाच्या वितरण पेटीला चिकटवली होती.त्यामुळे शाखा कार्यालयातील कर्मचा-यांना जानेवारी-२०१८ च्या थकबाकी वसूली यादीमध्ये पुनः मेंसर्स इंटीग्रेटेड एनर्जी इंजिनिरिंग यांचे वीज देयक भरले नसलेचे निर्देशनास आलेने कर्मचा-यांनी मेसर्स इंटीग्रेटेड एनर्जी इंजिनिरिंग थकीत विद्युत देयकापोटी विद्युत पुरवठा दिनांक २२.०२.२०१८ रोजी बंद केला. या पत्रासोबत ग्राहकाने विद्युत भरणा केलेला सविस्तर माहिती जोडण्यात आलेली आहे त्यावरुन आपणास मेसर्स इंटीग्रेटेड एनर्जी इंजिनिरींग विद्युत देयक नियमितपणे भरत नसलेचे निदर्शनास येईल.

प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी आज दिनंक ०६.०८.२०१८ रोजी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी तक्रारदारातर्फे श्री विकास घोडके तर वि.प. कंपनीतर्फे श्री गणेश पोवार, उपकार्यकारी अभियंता उपाविभाग कागल हे हजर होते. त्यांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

आमच्या निष्कर्षाकरिता खालील मुद्दे उपस्थित होतात.

१) तक्रारदाराची प्रस्तुतची तक्रार मंजूर करता येईल काय?
उत्तरः- होय

२) तक्रारदारास नुकसान भरपाई देणे योग्य होईल काय?
उत्तरः- अंशतः

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ व २ :-** तक्रारदार व वि.प.विज वितरण कंपनी यांची सुनावणी दरम्यान झालेली कथने लक्षात घेता ही बाब निर्विवाद सत्य आहे की, वादाची वीज देयकाची रक्कम तक्रारदारांचा वीज पुरवठा खंडीत केलेल्या वेळेपर्यन्त तक्रारदारांनी भरलेली नव्हती. परंतु वि.प. वीज कंपनीने कोणतीही लेखी पूर्व सूचना न देता ग्राहकाचा दिनांक २२.०२.२०१८ रोजी अचानक वीज पुरवठा खंडीत केलेला होता. तसेच यापूर्वीही दिनांक ०८.०२.२०१८ रोजी देखिल तक्रारदाराने वीज देयक भरले असतानाही वि.प.कंपनीच्या कर्मचा-यांने पूर्व सूचना न देता अचानक विज पुरवठा खंडीत केला होता. तक्रारदाराची तक्रार हीच आहे की, वीज पुरवठा वीज कायदा २००३ च्या कलम ५६ चा भंग करुन म्हणजे सदर कलमात नमूद केलेली १५ दिवसांची लेखी नोटीस न देता वि.वि.कंपनीने च्या कर्मचा-यांनी त्यांचा विज पुरवठा खंडीत केलेला आहे. त्यामुळे त्यांचे नुकसान झालेले आहे. सुनावणी दरम्यान सदर नुकसानीच्या पुराव्याचे फोटोची तक्रारदारांनी सादर केले. तक्रारदार हा ॲल्युमिनियम डाय कास्टींगचा उत्पादक आहे. ॲल्युमिनियम डाय कास्टींगचे उत्पादन साठी म्हणून त्याच्याकडे सुमारे तीन वीज भटया (Electrical furnaces) ॲल्युमिनियम वितळविण्याकरिता आहेत. त्यापैकी दिनांक २२.०२.२०१८ रोजी वि.वि.कंपनीने वीज पुरवठा पूर्व सुचना न देता खंडीत केल्यामुळे वितळलेले ॲल्यमुमिनियम धरुन ठेवणारे मूस (Moose) दबावामुळे तुटले गेले याबाबतचे फोटो पुरावे तक्रारदारानी सुनावणी दरम्यान उपस्थित केले . तसेच त्यांनी मूसचे परचेस इँनव्हॉईस ही सादर केले आहेत. त्यामध्ये तुटलेल्या इलेक्ट्रीकल्स भट्टयांची (मूसची) रक्कम सुमारे ६३,७०३/- दर्शविलेली आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

वि.व.कंपनीच्या कथनानुसार विज कायदा २००३ च्या कलम ५६प्रमाणे १५ दिवसांची नोटीस ही विज पुरवठा खंडीत करण्यापूर्वी तक्रारदारांवर बजावण्यात आली होती व त्यानंतरच तक्रारदारांचा विज पुरवठा खंडीत करण्यात आलेला होता. वि.प.कंपनीचे कथन तक्रारदारांनी अमान्य केले.वि.प. कंपनीने अशी नोटीस बजावून ती तक्रारदाराला मिळाली की नाही किंवा तक्रारदारास नोटीस मिळून तसे त्याने लेखी पोहोच दिलेली आहे की नाही ही बाब वि.प.कंपनीने सुनावणी दरम्यान सिध्द केलेले नाही, अथवा तसा पुरावाही दिलेला नाही. ज्या अर्थी वि.प. कंपनीने तक्रारदारास विज कायदा २००३ कलम ५६ प्रमाणे नोटीस न देता विज पुरवठा खंडीत केला व त्यामुळे तक्रारदाराचे नुकसान झाले त्या अर्थी तक्रारदाराची नुकसान भरपाईची मागणी ही विज कायदा २००३ मधील नियमांचे व आदेशाचे पालन न करणे किंवा त्या अनुषंगाने करावयाची कोणतीही कार्यवाही जी मंच किंवा विद्युत लोकपालाच्या जसे असेल तसे, अधिकारक्षेत्रात येत असेल त्याबाबत गा-हाणे मध्ये निश्चित समावेश होतो. मंचाला एखाद्या वितरण परवाने धारकाने परवाना कंत्राट, करारान्वये किंवा आयोगाने, कायद्याने निर्दिष्ट केलेल्या वीज पुरवठा संहितेखाली किंवा वितरण परवाने धारकांच्या कामगिरीच्या मानकांच्या संदर्भात पार पाडण्यासाठी स्विकारलेल्या कामगिरीचा दर्जा, स्वरुप, ती पार पाडण्याची पद्धत या मधील कोणताही दोष अपूर्णता , त्रुटी किंवा अपुरेपणा ज्यात इतर बाबी बरोबर आयोगाच्या तसेच कायद्या मधील आदेशाचे पालन न करणे बाबत येणा-या गा-हाण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याचे अधिकार मंचास निश्चितच आहेत. सबब मुद्दा क्र.१ चे उत्तर आम्ही होय असे दिलेले आहे.

तक्रारदाराने नुकसान भरपाई संदर्भात केलेल्या दाव्याबाबत त्याने Moose तुटली म्हणून त्यांची किंमत रु. ६३,७०३/- आणि तक्रारदाराचा विज पुरवठा खंडीत केल्यानंतर वीज देयक भरुनही विज पुरवठा सुमारे ५ तास सुरु केला नाही म्हणून पूर्ण एका शिफ्टचे उत्पादनाचे काम बंद राहिल्यामुळे पूर्ण शिफ्टच्या उत्पादनातील घट (Production Loss) ची एकूण रक्कम रु. ८०,०००/- अशी नुकसान भरपाई मागितलेली आहे. सुनावणी दरम्यान तक्रारदाराने तुटलेल्या इलेक्ट्रीकल्स भट्टयांचे पूर्ण फोटो दाखवले तसेच त्याचे खरेदी बिल उपस्थित केले परंतु Production Loss बाबत कोणतेही पुरावे उपलब्ध केलेले नाहीत. म्हणून शिफ्टच्या Production Loss चा नुकसान भरपाईसाठी विचार करता येणार नाही. विज पुरवठा खंडीत केल्यामुळे तुटलेल्या मूसची रक्कम रु. ६३,७०३/- इतकीच नुकसान भरपाईसाठी धरणे उचित ठरेल, म्हणून मुद्दा क्र. २ चे उत्तर अंशतः असे दिलेले आहे.

सबब प्रस्तुतचे प्रकरण मंजूर करुन तक्रारदारास नुकसान भरपाई द्यावी लागेल या निष्कर्षाला आम्ही आलो आहोत. सबब आम्ही खालील आदेश पारीत करीत आहोत.

## आदेश

१) प्रस्तुतची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) तक्रारदारास वि.वि.कंपनीने विज कायदा २००३ , कलम ५६ प्रमाणे नोटीस न लागू करता विज पुरवठा खंडीत केल्यामुळे तक्रारदाराच्या विजेवर चालणा-या मूस तुटून नुकसान झाल्याने नविन मुसचे रु. ६३,७०३/- इतकी रक्कम नुकसान भरपाई म्हणून वि.प. कंपनीने या आदेशाच्या तारखेपासून ४५ दिवसांच्या आत द्यावी.

**दिनांक : १४.०८.२०१८**

**( पी.एस. पुजारी)**

**सदस्य ग्राहक तक्रार निवारण मंच कोल्हापूर**